भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०९/२०१७

**१) अल्पवयीन मुलींना पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०९/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला संशयीत आरोपीने पळवुन नेल्याचे फिर्यादीने संशय व्यक्त केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल स्लीप होवुन स्वत: व मागे बसलेला इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०९/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत एन एच ०६ रोडने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन स्वत: स्लीप होवुन तसेच मोटार सायकलवर मागे बसलेला जखमी इद्रपाल करंजेकर वय २३ वर्ष, रा. देवरी हा खाली पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :–**

दिनांक २१/०९/२०१७ चे १९.१५ वाजता दरम्यान यातील जखमी मंगल कवळु मेश्राम वय ४० वर्ष, रा. सोनेगाव हा विलास नान्हे याचे सोबत पवनी वरुन सिंधपुरी येथे रोडचे डावे बाजुने पायी जात असतांना मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मंगल मेश्राम हयास मागेहुन धडक मारल्याने खाली पडुन जखमी झाला व मोटार सायकल चालक सुध्दा खाली पडुन जखमी झाल्याने, चौकशी वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनी. डहाके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टर चालकांने एसटी बसला धडक मारुन बसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे १३.३५ वाजता दरम्यान यातील एसटी बस क्र. एमएच ०७ सी ९३०५ चा चालक आपले एसटी बसमध्ये प्रवासी बसवुन भंडारा वरुन भंडारा रोड सनफ्लॅग येथे जात असतांना, विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन एसटी बसचे ड्रायव्हर साईडचे मागचे भागाला धडक मारुन ४,०००/—रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी गणेश रामभाऊ सार्वे वय ४० वर्ष, रा. सहकार नगर डॉ. पथकी नगर यांचे घराजवळ भंडारा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) प्रकृती बरी नसल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु. :—**

दिनांक २१/०९/२०१७ चे २३.५५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. कांता रामफल कटोते वय ६५ वर्ष, रा. विठ्ठल गुजरी वार्ड पवनी हिची प्रकृती बरी नसल्याने तिला औषधोपचारा करीता सा. रु भंडारा येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**६) किटक नाशक औषध प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु. :—**

दिनांक १७/०९/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील मृतक भाऊराव संतोष चुधरी वय २१ वर्ष, रा. भुयार याने दारुचे नशेत थिमेंट विटक नाशक प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास प्रथम उपचार करीता ग्रा. रु. भिवापुर येथे भरती केले व नंतर पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो. स्टे पवनी हे करीत आहेत.

**७) विदयुत करंट लागुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक राजकुमार धनीराम आगासे वय ४३ वर्ष, रा. कर्कापुर हा त्याचे शेतावरील धानाला पाणी देण्यास गेला असता व शेतातील मोटार पंप सुरु करीत असता विदयुत शॉक लागुन मरण पावल्याने, फिर्यादी योगेश्वर राजुकुमार आगाशे वय २० वर्ष, रा. कर्कापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०९ केसेस करण्यात आले आहे.

**सपोनी. पी. के. बोरकुटे**
**पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.९६५७४०७१७३**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यॉंस विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.